# प्रकरण एक

## चित्रपटाच्या उदयाची पार्श्वभूमी

कोल्हापूर संस्थानने या शतकाच्या विसाव्या दशकापासून सामिलीकरणा पर्यंत सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक क्षेत्रात भरीव प्रगती केली. याच काळात वैज्ञानिक प्रगतीमुळे चित्रपटाचा उदय झाला आणि करमणुकीच्या विश्वात एक मोठी क्रांती घडून आली. भारतात आणि विशेषत: महाराष्ट्र ज्या मर्यादित ठिकाणी चित्रपट निर्मितीचा प्रारंभ झाला, त्यात कोल्हापूर संस्थानची प्रामुख्याने गणना होते. या प्रकरणामध्ये कोल्हापूर धार्मिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ठयांचा आढावा घेऊन चित्रपट निर्मितीच्या प्रारंभाचा उहापोह करण्यात आला आहे.

### धार्मिक महत्व :

महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर हे शहर १६$^0$ ४२' उत्तर अक्षांश व ७४$^0$ १६' पूर्व रेखांशावर सहयाद्रीच्या पूर्वेस १८७० फूट उंचीवर पंचगंगा नदीच्या दक्षिण तिरावर वसलेले आहे.[१]

धार्मिक दृष्टीकोनातून कोल्हापूरला अत्यंत महत्व आहे.

कोल्हापूर प्राचीन काळापासून दक्षिण काशी या नावाने प्रसिध्द आहे.[२] करवीर हे या नगरीचे जुने नांव, कुराधारी-करवीर म्हणजेच गदा धारण करणा-या महालक्ष्मीचे नगर, अशी व्युत्पत्ती लावली जाते.[३]

या महालक्ष्मीचे मंदिर हे कोल्हापूरचे महत्वाचे धार्मिक वैशिष्ठ्य आहे. कोल्हापूर शहराच्या वायव्येस सहा सात मैलावर ३१०० फूट उंचीच्या डोंगरावर वाडी रत्नागिरी नावाच्या खेडयात ज्योतिबाचे मंदिर आहे. सध्या ज्योतिबा, केदारेश्वर, महादेव व चोपडाई अशा देवतांनी मंदिरे अगदी जवळजवळ आहेत. [४] त्र्यंबोली देवीचे मंदिर कोल्हापूरच्या पूर्वेला दीड मैलावर एका टेकडीवर आहे. हे मंदिर पाचशे वर्षांपूर्वी बांधले गेले. [५] अशा रितीने अनेक मंदिरांमुळे कोल्हापूरला धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे.

## वास्तुशिल्प :

येथील महालक्ष्मीचे मंदिर हे हिंदू वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. या मंदिराचा चौथरा ताराकृती असून मंदिराचे गर्भागार कर्णदेव नावाच्या चालुक्य राजाच्या सुभेदाराने इ. स. ६३४ मध्ये बांधले. शिलाहार राजा मारसिंहने या मंदिराचा कलापूर्ण विस्तार केला, व त्याच वंशातील गडरादित्याने मंदिरावर कळस चढविला. [६] मुख्य मंदिरास महाकाली व महासरस्वती या देवतांची मंदिरे यादव राजवटीत म्हणजे इ. स. १२१८ ला जोडली. महालक्ष्मीच्या प्रांगणात अनेक देवतांची मंदिरे आहेत. [७]

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

कोल्हापूरच्या ऐतिहासिक परंपरेचा विचार करताना जवळजवळ दोन हजार दोनशे वर्षांपूर्वी या नगराची पहिली वसाहत पंचगंगा नदीकाठी ब्रम्हपुरी या भागात झाली. [८] कृष्णराज सातवाहन [ तिसरे शतक ] हा येथील पहिला राजा व त्यानंतर इ. स. २१८ ते ५०० हा प्रदेश राष्ट्रकूटांच्या राजवटीखाली होता. [९] वातापीच्या चालुक्यांचे इ. स. ५०० ते ७५०

पर्यंत व नंतर पुन्हा इ.स. ७५० ते इ.स. ९७५ पर्यंत येथे राष्ट्रकूटाचे राज्य होते. यानंतर अनुक्रमे चालुक्य, शिलाहार, यादव या घराण्यांनी इ. स. १३०७ पर्यंत राज्य केले. याच वर्षी मलीक काफूरने यादवांचा पराभव केला. इ.स. १४९८ मध्ये बहामनी राज्याच्या अस्तानंतर विजापूरच्या आदिलशहाकडे कोल्हापूर आले व त्यानंतर १६३६ साली शहाजहान या मोगल सम्राटाने कोल्हापूर जिंकले. पण लवकरच आदिलशहाला परत केले. शककर्ते शिवाजी महाराजांनी [ १६७४ - १६८० ] पन्हाळा व पावनगड हे किल्ले घेतले. पुढे अधून-मधून आदिलशाही व दिल्लीचे मोगल यांच्याकडे हा भाग गेला, तर औरंगजेबाच्या मृत्युनंतर म्हणजे १७०७ नंतर पन्हाळा किल्ला किल्लेदाराने मराठ्यांच्या स्वाधीन केला. [१०]

शिवाजी महाराज यांचे दोन पुत्र संभाजी महाराज [ १६८० - १६८९ ] व राजाराम महाराज [ १६८९ - १७०० ] यांच्यानंतर संभाजी पुत्र शाहू [ १७०८ - १७४९ ] व राजाराम महाराजांची पत्नी ताराराणी [ १७०० - १७१४ ] यांच्यात संघर्ष सुरु होऊन ताराराणींनी १७१० मध्ये पन्हाळ्याला येऊन स्वतंत्र गादीची स्थापना केली. आपला पुत्र शिवाजी [ पहिला ] यांच्या छत्रपतीपदाची द्वाही फिरविली. [११] ताराबाई व शिवाजीराजे १७१४ साली कैदेत पडले व संभाजीराजे [ १७१२ - १७६० ] हे शिवाजीराजाचे सावत्र बंधु कोल्हापूर राज्याच्या गादीवर आले. पुढे १९३१ मध्ये संभाजीराजे 1731 व सातारचे शाहू यांच्यात वारणेचा तह झाला. त्यानुसार दोन्ही छत्रपतींनी एकमेकांच्या सत्तेला मान्यता दिली. [१२] छत्र. संभाजींच्या निधनानंतर खानवटकर - भोसले घराण्यातील पुत्र दत्तक घेऊन शिवाजी [दुसरे] [ १७६२ - १८१२ ] या नांवाने २७ सप्टेंबर, १७६२ रोजी कोल्हापूर राज्याच्या सिंहासनावर बसविले. [१३]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

त्यांनी १७८८ मध्ये पन्हाळ्यावरून राजधानी कोल्हापूरास आणली.[१४]

त्यांच्यानंतर त्यांचे जेष्ठ पुत्र शंभू महाराज [ १८१२ - १८२१ ] गादीवर आले.[१५] त्यांचा १९२१ साली क्षुल्लक कारणावरून हत्या झाली व त्यानंतर त्यांचे बंधू छत्र. शहाजी [ १८२१-१८३७ ] गादीवर आले.[१६] त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र शिवाजी[तिसरे] [१८३७-१८६६] छत्रपती झाले.[१७] त्यांनी आपल्या भगिनीच्या मुलाला नागोजीराव पाटणकर यांना दत्तक घेतले. हे छत्रपती राजाराम [दुसरे] [ १८६६-१८७० ] कोल्हापूरच्या गादीचे वारस झाले.[१८] त्यांच्यानंतर खनवटकर भोसले घराण्यातील पुत्रास दत्तक घेतले व ते शिवाजी [चौथे] [ १८७०-१८८३ ] म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आले.[१९]

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर कागलकर घाटगे घराण्यातील पुत्र यशवंतराव यांना दत्तक घेऊन १८९४ साली संस्थानचा कारभार त्यांच्या हाती देण्यात आला.[२०] या शाहू महाराजांच्या [ १८९४-१९२२ ] कारकिर्दीत कोल्हापूरात राजकीय, सामाजिक, चळवळी, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक प्रगती झाली.

राजर्षि शाहू महाराजांनी जी अनेक कार्ये केली त्यात त्यांनी ब्राम्हणेत्तर चळवळीस सक्रीय पाठींबा देऊन ब्राम्हणांची वतने नष्ट करणे, धर्मविधी इतर जातींकडून करून घेणे, वेदाभ्यासासाठी वैदिक विद्यालये स्थापणे, अशी अनेक कार्ये हाती घेतली.[२१] त्यांच्याच प्रयत्नाने मुंबई इलाख्यात मराठा व तत्सम जातीसाठी सात राखीव जागा व अस्पृश्य समाजासाठी एक राखीव जागा मिळाली.[२२] अस्पृश्यता निवारणाचे कार्य त्यांनी मोठ्या प्रमाणावर हाती घेतले. टपाल वाटण्यासाठी हुलस्वार, हत्तीवरील माहूत,

कोचमन अशा अनेक कामांसाठी त्यांनी अस्पृश्यांची नेमणूक केली.[२३] कोल्हापूरातील सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस व सत्यशोधक समाजाच्या चळवळींना त्यांनी प्रोत्साहन दिले.[२४]

त्यांनी अनेक वटहुकूम काढून सामाजिक सुधारणांचा पाया घातला. मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविणे, पाटाच्या किंवा विधवा विवाहास कायद्याने मान्यता देणे, बहिणीच्या किंवा मुलीच्या मुलास दत्तक घेण्यास कायद्याने मान्यता देणे असे अनेक वटहुकूम काढले.[२५] नागपूर येथे १९२० मध्ये भरलेल्या " बहिष्कृत समाज परिषदे " चे ते अध्यक्ष होते.[२६] शाहू महाराजांनी शैक्षणिक व औद्योगिक विकासासही चालना दिली. कोल्हापूर संस्थानातील प्राथमिक शिक्षण मोफत केले. " व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग " या वसतिगृहाची स्थापना केली. इतर जातीच्या लोकांसाठीही वसतिगृहे काढण्यास जागा दिल्या.[२७] मागासलेल्या वर्गांना मोफत सक्तीचे शिक्षण देण्यासाठी अनेक शाळा काढल्या.[२८] औद्योगिक क्षेत्रातही " शाहूपुरी व्यापारी पेठे " ची स्थापना केली. यंत्रोद्योगात " शाहू मिल " नावाची कापड गिरणी स्थापन केली.[२९] अशा रितीने सहकारी पतपेढया, ग्राहक संघ, कारखाने, इ. सर्व क्षेत्रे कोल्हापूरात सुरू केली.[३०] अशा रितीने कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासास मोठया प्रमाणात चालना दिली.

## १९१९ ते १९४९ या काळातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक प्रगती

### राजकीय व सामाजिक प्रगती :

राजर्षि शाहू नंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज [तिसरे] [१९२२-१९४०] गादीवर आले.[३१] शाहू महाराजांनी सुरू केलेल्या सर्व संस्था व सुधारणा

त्यांनी चालू ठेवल्या.[३२] ब्राम्हणेत्तर चळवळीस त्यांनीही पाठींगा दिला. राजाराम महाराज १९२२ मध्ये सातारा येथे भरलेली ब्राम्हणेत्तर परिषद व १९२६ मध्ये अमरावती येथे भरलेल्या अखिल भारतीय ब्राम्हणेत्तर सामाजिक परिषदेचे अध्यक्ष होते.[३३] १९२२ ते १९३० या काळात म. गांधींच्या [ १८६९-१९४८ ] नेतृत्वाखालील काँग्रेसच्या चळवळीचा प्रभाव वाढू लागला होता. राष्ट्रीय चळवळीच्या लाटेपुढे सत्यशोधकी चळवळीचा भर ओसरु लागला.[३४] कोल्हापूरात भाई माधवराव बागल [ १८९५-१९८६] यांनी जबाबदार राज्यपध्दतीच्या मागणीसाठी प्रचार व काँग्रेस कमिटीची १९३२ मध्ये स्थापना केली. कोल्हापूर संस्थान " प्रजा परिषदे " ची स्थापना देखील त्यांनी १९३९ मध्ये केली.[३५] याच वर्षी कुपवाड येथे प्रजा परिषदेचे अधिवेशनही झाले.[३६] राजाराम महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोल्हापूरची नगरपालिका लोकनियुक्त केली गेली व इलाख पंचायतीची स्थापने बरोबरच तीन न्यायमूर्तींचे एक स्वतंत्र वरिष्ठ न्यायालय [हायकोर्ट] ही त्यांनी स्थापन केले.[३७]

राजाराम महाराज निपुत्रीक असल्याने त्यांच्या निधनानंतर १९४२ साली चावरेकर भोसले घराण्यातील प्रतापसिंह यांना दत्तक घेऊन त्याचे नांव शिवाजी ठेवले. छत्र. शिवाजी [पाचवे] [ १९४२-१९४६ ] याचे अल्पावधीतच निधन झाले.[३८] याच काळात प्रजापरिषदेची चळवळ चालूच राहिली. १९४२ मध्ये गांधीजींच्या " छोडो भारत " चळवळीचे पडसाद कोल्हापूरातही उमटले. सभा, मोर्चे, हरताळ, सत्याग्रह, खजिन्यावर हल्ले करणे वगैरे प्रकार झाले. त्याचप्रमाणे विद्यार्थी चळवळही फोफावली.[३९]

बाल छत्रपती शिवाजी याचे १९४६ ला निधन झाल्यानंतर देवासचे अधिपती विक्रमसिंह पवार यांना ३१ मार्च, १९४७ रोजी दत्तक घेण्यात आले.

त्याचेच नांव शहाजी महाराज असे ठेवण्यात आले. [४०] त्याआधी दुस-या महायुध्दाच्या [ १९३९-१९४५ ] काळात सैनिक अधिकारी म्हणून प्रत्यक्ष रणांगणावर रोमेल या जर्मन सेनापती बरोबरच्या लढाईत व हिंदुस्थानात त्यांनी उत्तम कामगिरी केली होती. [४१] १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानातील प्रजेला राज्यकारभार पाहण्याचा अधिकार मिळावा म्हणून चळवळी होऊ लागल्या. कोल्हापूरच्या नेतृत्वाखाली दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांचे संघराज्य करण्याच्या हालचाली सुरु झाल्या. लोकनियुक्त मंत्रीमंडळासाठी वाटाघाटी सुरु झाल्यावर शहाजी महाराजांनी कांही खाती स्वत:च्या अखत्यारीत ठेऊन प्रजापरिषदेचे चार मंत्री मंत्रीमंडळात घेण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार प्रजा परिषदेचे प्रमुख पुढारी माधवराव बागल यांच्या शिफारसीने चार मंत्री महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात सामील झाले. गांधीजींच्या वधानंतर भारत सरकारने कै. नंजाप्पा नांवाचे प्रशासक पाठवून कोल्हापूरचा कारभार त्यांच्याकडे सोपविला व बागल मंत्रीमंडळ बरखास्त झाले. पुढे १ एप्रिल, १९४९ रोजी कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलीन झाले. [४२]

**<u>शैक्षणिक प्रगती :</u>**

या कालखंडात कोल्हापूरात मोठया प्रमाणावर शैक्षणिक सुधारणा व प्रगती झालेली दिसून येते. १९२२ मध्ये कोल्हापूरात ५५९ शाळा व त्यात ३१,०९६ विद्यार्थी शिकत होते. [४३]

" शिक्षण " हा विषय छ. राजाराम महाराज यांच्या आवडीचा होता. त्यांच्या कारकिर्दीत १९२७-२८ मध्ये राजाराम महाविद्यालयात एम्. ए. व एम्. एस्सी. पर्यंत शिक्षणाची सोय झाली. स्त्रीयांना महाविद्यालयीन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिक्षण मोफत करण्यात आले. " शाहूकला लॉ कॉलेज " १९३३ व " महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेज " १९३४ मध्ये स्थापन झाले. १९४० मधून ८६५ शाळा व त्यामधून ६२,७८६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. १९४१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १३ टक्के होते. [४४]

१९४२ साली शहरातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी दरबाराकडून नगरपालिकेकडे देण्यात आली. शाळांच्या इमारती हवेशीर असाव्यात, प्रशस्तही असाव्यात, त्यांना मोकळी क्रिडांगणे, प्रशिक्षित शिक्षकवर्ग मिळावा या गोष्टींकडेही आत्मीयतेने लक्ष देण्यात आले. [४५] १९४४-४५ मध्ये १,२९९ शिक्षण संस्था व ८८,५१० विद्यार्थी होते. [४६] १९४९ साली कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्यावर, शासनाच्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे कोल्हापूर जिल्हयातील शिक्षणाची व्यवस्था झाली. [४७]

वृत्तपत्रसृष्टीचा विकास देखील होण्यास सुरुवात होऊन " हंटर " नावाचे साप्ताहिक १९२५ साली सुरु झाले. [४८] " सत्यवादी " या साप्ताहिकाचे प्रकाशनही १९२७ पासून कोल्हापूरात सुरु झाले, तर १९३३ साली " सेवक " हे साप्ताहिक सुरु झाले. तसेच " चंद्रकला", " सिनेमासृष्टी " ही मासिके देखील सुरु झाली होती. [४९] १९३८ च्या प्रारंभी सुरु झालेल्या " पुढारी " साप्ताहिकाचे १९३९ साली दैनिकात रुपांतर झाले. त्याचवेळी " समाज " हे साप्ताहिकही सुरु झाले. [५०] १८९५ ला सुरु झालेल्या विद्याविलास नियतकालिकाचे मासिकातून पाक्षिक, त्यातून साप्ताहिक, द्विसाप्ताहिक व त्रिसाप्ताहिक होऊन अखेर दैनिकात रुपांतर झाले. १९३६ ते १९४७ अखेर कोल्हापूरात झालेल्या राजकीय लढयाचे "विद्याविलास" हे मुखपत्र होते. १९४८ साली झालेल्या जाळपोळीत या पत्राचे सर्वस्व जळाले व चालकांना ते बंद करणे भाग पडले. [५१] १९४० ते १९५० या काळात अनेक

साप्ताहिके व दैनिके कोल्हापूरात निघाली.[५२] दुसरे महायुध्द व देशातील राष्ट्रीय आंदोलनाच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचण्यास यामुळे मदत झाली असे दिसते.

## औद्योगिक प्रगती :

इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे या क्षेत्रातही प्रगती होत होती. शेतीची सुधारलेली अवजारे बनविण्यास सुरुवात झाली होती. २७ ऑगस्ट, १९२७ ला " श्री शाहूपूरी व्यापारी असोसिएशन " व १९४५ मध्ये " शेतमाल बाजार समिती " ची स्थापना करण्यात आली.[५३] साखर उद्योगात कोल्हापूर अग्रेसर असल्याने १९३२ मध्ये " शुगर मिल " सुरु झाली.[५४]

१९२५ साली स्थापन झालेल्या " एस. यशवंत आणि कंपनी " सर्व त-हेची सुधारलेली शेतीची अवजारे बनविण्यास सुरुवात केली. शेती व इतर उद्योगधंद्यासाठी लागणा-या लाखो रुपयांची यंत्रे १९३२ अखेर या संस्थेने विकली. पुढे १९३७ साली पॉवरवर चालणारे उसाचे चरक, लोखंडी नांगर, हँड पंप यांचे उत्पादनही संस्था करु लागली. १९४१ साली " कास्ट आयर्न फौंड्री " ही सुरु केली.[५५] १९४८ ला संस्थेचा कारखाना पंधरा लाख रुपयांचा मर्यादित [ लिमिटेड ] केला होता. पण गांधी वधानंतर झालेल्या जाळपोळीत तो जाळला गेला.[५६] कोल्हापूरात १९३८ साली वाय.पी. पोवारांनी यंत्रसामुग्री बनविणारा छोटा कारखाना काढला. नंतर त्याचे रुपांतर १९४९ मध्ये " पॅको प्रा. लि. " नावाच्या संस्थेत झाले. पोवारां-बरोबरच अतिग्रे व कोठावळे हेही त्याचे भागीदार झाले. पिठाच्या गिरण्या, एंजिन्स, पत्र्याच्या लहान-मोठया पुल्या, याशिवाय वेल्डींग व फौंड्री विभागही सुरु केले गेले.[५७]

इतरही अनेक कारखाने कोल्हापूरात सुरु झाले होते. अशा रितीने औद्योगिक क्षेत्रातही कोल्हापूर आघाडीवर होते.

अशा रितीने धार्मिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक वैशिष्ठयांबरोबरच " सांस्कृतीक जीवनात " ही कोल्हापूरने आपले वैशिष्ठयपूर्ण स्थान निर्माण केलेले दिसून येते.

## सांस्कृतिक जीवन :

कोल्हापूरात राजाश्रयामुळे अनेक कलांचा व कलाकारांचा विकास झाला. कोल्हापूरात अस्तित्वात असणारी करमणुकीची साधने अशी होती.

## पोवाडा [ शाहिरी ] :

पोवाडा हा तात्कालिन राजकीय घटनेवर आधारित असून, त्याची भाषा सरळसोट असते. त्यातील प्रत्येक परिच्छेदास चौक म्हणतात. गायक गण व पथ दोन्हीत घटनेचे वर्णन करतो. पोवाडा सादर करणा-यास " शाहीर " म्हणतात. पेशवेकालात हा प्रकार जास्त लोकप्रिय झाला. " डफ " हे वाद्य शाहीर पोवाडा सादर करताना वाजवितो. [५८]

शिवकालापासून शाहिरी कलेला राजाश्रय लाभलेला आहे. राजर्षि छ. शाहू महाराजांचा कोल्हापूरच्या शाहिरांना आश्रय होता. कलावंत शाहिरांना शाहू महाराजांनी सरकार दरबारी नोक-या दिल्या होत्या. शाहिरांना गाण्याच्या तालमीसाठी मोफत जागाही दिल्या होत्या. [५९] याच काळात कलगीतु-याचे भेदिक गाणे बरेच लोकप्रिय होते. कोल्हापूर हे भेदिक गाण्याबद्दल प्रसिध्द आहे. यात कलगी व तुरा असे दोन पक्ष असतात. सृष्टीतील सर्व व्यवहार माया करते. ईश्वर किंवा पुरुष तटस्थ आहे, असे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कलगीवाले प्रतिपादन करतात, तर मायेला घेऊन ईश्वर सर्व कांही करतो, असे तुरेवाल्यांचे मत असते. या दोन्ही पक्षांच्या लोकांकडून वेदांत विषयावर केलेली कवने राजर्षिंच्या काळात गायली गेली. यानाच भेदिक गाणे म्हणतात. ही गाणी म्हणजे अध्यात्माच्या दोन विचारसरणींच्या अनुयायांची मांडणे किंवा कूटप्रश्नाचे सवाल-जबाब होय. [६०]

कोल्हापूरच्या शाहिरी वाङ्मयाचा विचार करताना सुरुवातीस कृष्णराव शाहिर हे नांव येते. कृष्णराव सदाशिव निळकंठ यांचा श्री. शिवाजी महाराजांचा पोवाडा, ख्रिस्त शक १८९८ मधील आहे. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत शीघ्र कवित्वामुळे प्रसिध्दीस आलेले शाहीर म्हणजे लहरी हैदर होय. हे या परंपरेतील अग्रगण्य शाहिरच नव्हे, तर आधुनिक मराठी शाहिरांचे ते अग्रदूत मानले जातात. [६१] कलगीतु-याचा सवाल - जबाबाच्या भेदिक गाण्याच्या स्पर्धा लावून त्यांना जरतारी फेटे, रोख बक्षिसे व मानाच्या पदव्या देऊन शाहू महाराज त्यांचा गौरव करीत. [६२] लहरी हैदरनी ऐतिहासिक व सामाजिक स्वरूपाचे बरेच पोवाडे लिहीले आहेत. झाशीची राणी, तानाजी मालुसरे, छत्रपती शाहू, हिंदुस्थानचे दारिद्र्य, आधुनिक फाजील सुधारणेचा पोवाडा, जोधपुरची राणी, भोंदू साधू, इ. त्याचे पोवाडे प्रसिध्द आहेत. [६३] राजकवी रामचंद्र नरहर माळी यांनी छत्रपती घराण्यावर लिहीलेल्या पोवाडयांचा संग्रह १९२२ मध्ये प्रसिध्द झाला. त्याचप्रमाणे शाहिर म. ना. नानीवडेकर व कविवर्य ग. दि. माडगुळकर [ १९१९-१९७७] यांची शाहिरातील कामगिरी कोल्हापूराशी निगडीत आहे. नानिवडेकर यांच्या पोवाड्यात शिवाजीचा पोवाडा व महात्मा गांधीवरील पोवाडा, हे पोवाडे महत्वाचे आहेत. माडगुळकर यांच्या ऐतिहासिक विषयावरील पोवाडयात धर्मवीर संभाजी, समर्थांचे सामर्थ्य, लोकमान्य टिळक, आण्णासाहेब खासगीवाले इ. पोवाडे प्रमुख आहेत. [६४]

शाहिर लहरी हैदर यांच्या शिष्यात शाहिर शंकर कुंभार व शाहिर पिराजीराव सरनाईक ही दोन महत्वाची नावे आहेत. श्री. कुंभार यांच्या 'सत्य समाज व त्याचे कार्य' या पोवाड्याबद्दल त्यांना " शाहिरतिलक " पदवी देण्यात आली. कोल्हापूरच्या सत्यशोधक समाजाने भरविलेल्या शाहिरी स्पर्धेत सरनाईक यांनादेखील 'सत्यशोधक समाजाचा पोवाडा' या-बद्दल शाहिरतिलक ही पदवी मिळाली.[६५] कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यावर त्यांनी अनेक पोवाडे लिहीले.[६६]

केवळ करमणूकच नव्हे तर लोकांना आवाहन करून जागृत ठेवण्यासाठी हे माध्यम महत्वपूर्ण वाटते. " पोवाडा " हा शब्द ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत नावलौकिक, किर्ती अशा अर्थांनी वापरला आहे. त्यावरूनच पोवाडा म्हणजे शूर विरांच्या किर्तीचे गीत बनला.[६७] राजाराम महाराज व छ. शहाजी महाराज यांनीही शाहिरांना शक्य ते सहाय्यक दिले.[६८].

तमाशा :

तमाशा हा पर्शियन शब्द असून, प्रदर्शन किंवा सामान्य खेडेगावाचे नाटक, असा याचा अर्थ होतो. नंतर उर्दू व त्यानंतर मराठीत हा शब्द प्रचलित झाला. १७ व्या शतकाच्या शेवटी २५ वर्षात व १८ व्या शतकात तमाशा सुरु झाला. सुरुवातीस तमाशा नाच गाणी यांच्याशी संबंधित होता, पण पेशवे काळापासून यात राजकीय घटना, कथा, गोष्टी, नाटकीय मूल्य आणले गेले. तमाशा तीन भागात विभागला गेला.[६९]

गण : म्हणजेच तमाशाची सुरुवात होय. ही गजाननाच्या प्रार्थनेने होते.

गौळण : यात कृष्णाची महती सांगणारे गाणे म्हटले जाते.

वग : समकालीन घटना, संवाद, नाच व गाणे या भागात येतात, नाची व सोंगाडया यात मुख्य असतात. लावणी ही तमाशाची महत्वाची बाजू असते. हे नाच नाचणा-या मुली सादर करीत असत. आकर्षक नाच, श्रृंगारीक गाणी, नाटकाचे मुल्य, विनोद व सुंदर संगीत, यामुळे १८ व्या व १९ व्या शतकात हा प्रकार लोकप्रिय झाला. लावणी ही श्रृंगारीक पध्दतीने व सामान्य माणसाच्या आवडीनुसार लिहीली व वाद्यांच्या सहाय्याने म्हटली जाई. स्त्री सौंदर्य हा लावणीचा मुख्य विषय असे. अनेक वेळा श्रृंगाराचे वर्णन धाडसी पध्दतीने लावणीत केलेले असे. नाचणा-या मुली आपल्या हावभावाने लोकांना आकर्षित करीत असत. [७०]

मराठीतील पहिला तमाशा वग १८६०-७० च्या सुमारास सांगली जिल्हयातील पेड व सावळज या गावातील उमा व बाबू या दोन मांग तमासगीरांनी रचला. त्याचे नांव " मोहना-बटाव " होते. कोल्हापूर भागातील सरदार दरकदारानी त्याला राजाश्रय दिला. [७१]

शाहू छत्रपतीनी तमाशाना उदार आश्रय दिला. त्यांनी भाऊ फक्कड या तमासगीराला कोडकौतुकाने आश्रय दिला. या कलेला प्रोत्साहन द्यावयाचे दुसरे कारण सत्यशोधक समाजाला पाठिंबा देऊन जाती-पातीची उच्चनिच्च भावना मोडावी, सोवळे-ओवळे खोटे आहे, कर्मकांड थोतांड आहे, असे दाखविणारे " वांग्याचे भूत " यासारखे अनेक वग सत्यशोधकी तमासगिरानी रचले व गाजविले. [७२] भाऊ फक्कड लहरीहैदर या लावणी कलाकारांना प्रोत्साहन दिले. नामवंत वग लेखक रेठरे बुद्रुक गावचा पठ्ठे बापूराव याला खास बोलावून मिठाराणी वग आपल्यासमोर शाहू महाराजांनी करविला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नंतर कोल्हापूरात मिठाराणीचे अनेक प्रयोग झाले.[७३] करमणुकीचे साधन म्हणून " तमाशा " हा प्रकार लोकप्रिय होता.

## किर्तन :

पुराण कथनाची परंपरा नंतर किर्तनामध्ये रुपांतरीत झाली. कथा आणि पारंपारिक गीते यांचे मिश्रण म्हणजे किर्तन होय.[७४]

किर्तने नवरात्र, गणेशोत्सव यासारख्या धार्मिक सणाच्यावेळी सादर केली जात. १८ व्या शतका दरम्यान आख्यान काव्य हा कवितेचा नवीन प्रकार उदयास आला. यात भारतांतील महाकाव्यातील कथा असत व यातून निती तत्वे लोकांना सांगितली जात. चांगल्या व वाईट कर्मांची फळे कायम लोकांसमोर धडा म्हणून ठेवली जात.[७५] प्रसिध्द किर्तनकार नारायणराव गोगटे [फलटणकर] यांचे किर्तन कोल्हापूरच्या रसिकांना ऐकण्यास मिळे. शाहू महाराज हे आपल्या रथातून त्यांची किर्तने ऐकण्यासाठी येत असत. त्यांचे गायकीचे ज्ञान व मधुर आवाजाची व अभिनयाची उपजत देणगी यामुळे त्यांची किर्तने हमखास रंगत असत.[७६]

## भजन :

भजन हा काव्याशी संबंधित असलेला धार्मिक करमणुकीचा प्रकार कोल्हापूरात लोकप्रिय होता.[७७]

भजन व किर्तन दोन्ही देव-देवतांचा आशिर्वाद मागण्यासाठी केले जाते व दोन्ही प्रकार अभंगाशी संबंधित आहेत. भजनाच्या प्रवाहाचे मूळ

महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या संतांनी लिहीले. अगदी सुरुवातीस ओवी व आर्या यांचा भजनात समावेश असे, पण नंतर अभंग हाच भजनाचा पाया राहिला. [७८]

दशावतार :

संत रामदासांच्या दासबोधामध्ये दशावताराचा उल्लेख असला तरी, करमणूकीचे साधन म्हणून १७२८ ला त्याचा उदय झाला. दशावतार कर्नाटकातून महाराष्ट्रात आले. या प्रकारात विष्णूच्या दहा अवतारांची कथा असते. प्रत्येक दशावताराच्या सुरुवातीस दशावतारी गजाननाचे स्मरण करतो. कथा, गीत, नृत्य व संवाद इत्यादी गोष्टींचा यात समावेश असतो. यात देव व राक्षसाचे मुखवटे वापरले जातात. [७९] करमणूक करण्याचे साधन म्हणून दशावतार कोल्हापूरात लोकप्रिय झाला होता.

भारूड :

हा प्रकार १७ व्या शतकात लोकप्रिय झाला असला तरी ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम भारूडे लिहीली. मनोरंजनाच्या विशिष्ठ शैलीमध्ये एकनाथांनी तिनशेच्यावर भारूडे लिहीली. पद्य व विनोदी गद्य यांचा समावेश या प्रकारात असतो. एकनाथांनी प्रतिकात्मक व आध्यात्मिक संदेश 'विंचू' या भारूडातून दिला. मानवी मनाची अपूर्णता किंवा दोष या भारूडातून दाखविले आहेत. नाटयमयता, परिचित पात्रे व तात्विक आशय, ही भारूडाची वैशिष्ठे होत. [८०] हा प्रकारही या काळात लोकप्रिय झाला होता.

गोंधळ :

" गोंधळ " हा धार्मिक कार्यक्रम देखील १५ व्या आणि १६ व्या शतकात लोकप्रिय झाला. भगवान परशुरामाने बेरासुर राक्षसास ठार केले आणि त्याचे डोके छाटून त्याच्या शरिरातील तंतू काढून ते त्याच्या डोक्यास लावले, त्यातून " तुणतुण " या वाद्याची निर्मिती झाली.[८१]

" गोंधळ " तीन भागात सादर केला जातो. सुरुवातीस गोंधळी गीत म्हटले जाते. त्यात जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, पंढरपूरचा विठोबा, कोल्हापूरची महालक्ष्मी या देव-देवतांचा आशिर्वाद मागितला जातो. दुस-या भागात " दिवटी " हातात घेऊन लोकनृत्य केले जाते. त्यानंतर गोंधळी भारतीय दंतकथा सांगून गोंधळ समारंभाचा शेवट करतो.[८२] कोल्हापूरात अस्तित्वात असलेल्या करमणुकीच्या साधनात गोंधळ हा प्रकारही लोकप्रिय होता.[८३]

संगीत व गायन :

या क्षेत्रातील छत्रपती शाहू महाराजांनी अनेक गुणसंपन्न कलावंतांना आश्रय दिला व कांहीना मदतही केली. त्यांच्या कारकिर्दीत अल्लादियाँ खाँ [ १८५५=१९४६ ], त्यांचे बंधू हैदरखाँसाहेब [ १८६१-१९३६ ] या जयपूर संस्थानातील उनियारा येथे जन्मलेले सुप्रसिध्द गायक कोल्हापूर दरबाराचे गायक म्हणून नोकरीवर हजर झाले.[८४] अल्लादियाँ आठवडयातून दोन दिवस देवीपुढे हजेरी देत व नवरात्रात नेहमी हजेरी देत. नव्या रागाचे गायन, लयबध्दता, तानांची आतषबाजी, विविधता विद्वत्ता व सौंदर्य व

बोलताना भारदस्तपणा वगैरे . गुणांमुळे त्याचे गायन प्रभावी होई.[८५] हैदरखाँचीही गाणी कोल्हापूरकरांना ऐकायला मिळत, ते स्वत:ही चिजा बांधीत.[८६] अल्लादियॉंचे सुपुत्र मंजीखाँ [ १८८८-१९३७ ] व भूर्जीखाँ हे दोघेही उत्तम गायक होते.[८७] महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक यांनीही अल्लादियाँ खानचे शिष्यत्व स्विकारले होते.[८८] त्यांनी स्वत:ची यशवंत संगीत मंडळी स्थापन केली होती.[८९]

गोविंदराव टेंबे [ १८८१-१९५५ ] हे नट व नाटककारच नव्हे, तर सुरपेटी, वादक, गायक, संगीत दिग्दर्शक असेही पैलू त्यांचेजवळ होते.[९०] नटसम्राट बालगंधर्व [ १८८८-१९६७ ] यांनीदेखील शाहू महाराजांच्या प्रेरणेनेच किर्लोस्कर मंडळीत प्रवेश केला. आपल्या गाण्याच्या मैफलीतूनच त्यांनी अवीट आनंद दिला.[९१]

१८९३ साली स्थापन झालेल्या संगीत संस्थेचा, देवल क्लबचा, १९४३ ला हीरक महोत्सव झाला.[९२] कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयाने ही संगीत वातावरणात भर घातली. प्रो. फडके यांनी कॉलेजमध्ये राजाराम म्युझिकल व आर्ट सर्कल काढले होते, अनेक कलावंतांची गाणी या सर्कलमार्फत रसिकांना ऐकावयास मिळत.[९३]

अशा त-हेने अनेक कलाकार, संगीत संस्थांनी व रसिकांनी कोल्हापूराची संगीत परंपरा वैभवशाली व समृध्द बनविली.

नाटक :

मराठी नाटकाची सुरुवात १८४३ मध्ये झाली. श्री. विष्णूदास भावे

यांनी आपले पहिले नाटक " सीता स्वयंवरा " वर लिहीले व सादर केले.[१४] त्यांनी भावे नाटक मंडळी सांगलीला स्थापन केली होती.[१५] १८५० च्या सुमारास नाटक हा करमणुकीचा प्रकार कोल्हापूरात रूढ होऊ लागला. कोल्हापूरातील अंबाबाईचे देवळातील गरुड मंडपात नाटके होत असत. अनेक नाटक संस्था व नाट्य कलाकारांना कोल्हापूरात छत्रपतीनी अनेक प्रकारची मदत दिली व प्रोत्साहन दिले.[१६]

१९०८ साली केशवराव भोसलेनी [ १८९०–१९२१ ] " ललितकला दर्शन नाटक मंडळी " ची स्थापना केली. १९२१ साली " संयुक्त मानापमान " नाटकाने त्यांनी अलोट किर्ती मिळाली.[१७]

१९१३ ला गायक नट बाल गंधर्वानी " गंधर्व नाटक संस्था " काढली. गोविंदराव टेंबे या संस्थेत होते. रंगभूमीवरील संगीताचा त्यांनी कायापालट केला. सिध्दसंसार, चित्रवंचना इत्यादी नाटके लिहीली. शंकरराव सरनाईक, गंधर्व इत्यादी लोकप्रिय नटाना संगीताचे शिक्षण दिले.[१८] १९१५–१६ च्या दरम्यान कोल्हापूरात " शिवराज संगीत मंडळी " ची स्थापना झाली. टेंबे हे या कंपनीचे सुत्रधार होते. शंकरराव सरनाईकही या मंडळात होते. संस्थेला लागणारे सर्व सामान शाहू महाराजांनी दिले होते.[१९] कृष्ण कांचन हा संस्थेचा हातखंडा प्रयोग असे. मानापमान व मृच्छकटिक या नाटकाचे हिंदी भाषांतर करून रंगभूमीवर ती नाटके आणली.[१००] १९२२–२४ च्या दरम्यान कोल्हापूरात " महाराष्ट्र नाट्य मंडळ " स्थापन झाले. श्री. भालजी पेंढारकर यांनी " राष्ट्र संसार " हे नाटक लिहून त्याचे प्रयोग केले. त्यांनी पुढे अजिंक्यतारा, असुरी लालसा, कायदेभंग अशी नाटके लिहीली.[१०१]

प्रसिध्द संगीत दिग्दर्शक व गायक सुधीर फडके यांनी १९३९ साली

" बिघडलेली वात " या संगीत नाटकाचे दिग्दर्शन केले.[१०२] राजाराम महाविद्यालयाने नाट्यक्षेत्रात आपली परंपरा निर्माण केली होती. प्रा.फडके यांनी " संजीवन ", " युगांतर ", " काळे-गोरे ", " जानकी, " " जडवाची देवी " अशी अनेक नाटके लिहून प्रयोगही रसिकांसमोर आणले.[१०३]

अशा रितीने " नाटक " हा करमणुकीचा प्रकार कोल्हापूरात लोकप्रिय होऊ लागला होता.

विटा :

हा खेळ फक्त कोल्हापूरातच खेळला जाई. चारपाच फूट अणकुचीदार पाते असलेले विटा नावाचे हत्यार असे व त्याला लाकडी दांडा असे. यात विटेकरी दांडयाच्या टोकाला दोरी बांधून दुसरे टोक आपल्या हाताला बांधून ठराविक पध्दतीने व पाक्रियात विटा फिरवून फेकला असता, दहावीस हातावरील मनुष्य ठार करण्यात येई. विटा गोलाकार, कोणत्याही बाजूस चपळाईने फेकता येत असल्याने एक विटेकरी बारा भालेक-यांना भारी पडत असते.[१०४]

साठमारी :

या प्रकारात हत्ती मैदानात सोडून एक किंवा जास्त माणसे त्याला झुलवून खेळवत असत. मस्तीत आलेल्या हत्तीला चिडवून खेळविण्याच्या प्रकारास साठमारी म्हणतात.[१०५] शाहू महाराजांनी कोल्हापूरात खासबाग मैदानाजवळ खास साठमारीचा आखाडा बांधला. हजारो लोक साठमारीचा खेळ कौतुकाने पहात असत.[१०६]

याशिवाय लाठी, दांडपट्टा, लेझीम हे खेळ देखील कोल्हापूरात लोकप्रिय होते. [१०७]

शिकार :

अनेक पशु-पक्षांची शिकार करणे, हा प्रकार कोल्हापूरात अत्यंत लोकप्रिय होता. केवळ प्रजेलाच नव्हे तर खुद्द शाहू छत्रपतींना शिकारीची आवड होती. चवताळलेल्या वाघाला देखील त्यांनी गळा दाबून ठार केले होते. [१०८] पाळलेल्या कुत्र्यांच्या सहाय्याने ते वाघाची शिकार करीत असत. [१०९] जनावरांची शिकार करण्याच्या अनेक पध्दती अस्तित्वात होत्या. हकारा पध्दतीने, म्हणजे चारी बाजूंनी आवाज करून, वाद्ये वाजवून जनावराला झुडुपामध्ये गाठून शिकार केली जाई, बकरी किंवा इतर प्राण्याचे आमिष दाखवून शिकार केली जाई. वर नमूद केल्याप्रमाणे चित्ते व शिकारी कुत्री पाळून ही शिकार केली जात असे. ससा, चितार, हरीण, डुक्कर, वाघ, सिंह इत्यादी प्राण्यांच्या शिकारी केल्या जात असत. [११०]

कुस्ती :

शाहू छत्रपती व राजाराम महाराज यांच्या काळात कुस्तीला महत्व प्राप्त झाले. [१११] छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर हे मल्लविद्येचे माहेरघर बनविले. भारतभर फिरून त्यांनी अनेक मल्लांना कुस्तीची आमंत्रणे दिली. मल्ल निवडून तयार केले, बाहेरून आणले. त्यांना व्यायाम करायला लावून, मुबलक खुराक देऊन मैदाने भरविली. [११२] विजयी मल्लांना गदा देण्याची प्रथा त्यांनीच सुरु केली. [११३] कल्लू, गामा, नारायण कसबेकर, ज्ञानू

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

माने, इमामबक्ष, म्हादू हंडे यासारख्या अनेक मल्लांना आश्रय दिला. [११४] कुस्त्यांसाठी खासबाग मैदानही बांधले. [११५] त्याचे पुत्र छ. राजाराम महाराजांनीही आपल्या मल्ल विद्येस प्रोत्साहन देऊन अनेक मल्लही पदरी ठेवले. त्यांच्या काळातही अनेक कुस्त्या झाल्या. त्याचप्रमाणे शहाजी महाराजांनी देखील मल्ल विद्येला प्रोत्साहन दिले. [११६]

अशा परिस्थितीत एक अपरिचीत, पण मनोरंजक माध्यक लोकांसमोर आले, ते म्हणजे चित्रपट.

चित्रपट :

चित्रपट निर्मितीचे अनेक संशोधकाचे अनेक वर्षापासून प्रयत्न सुरु होते. २८ मार्च, १८९५ साली " लंच अवर ॲट द ल्युम्येअर फॅक्टरी " हा पहिला चलत चित्रपट फ्रान्समध्ये ल्युमेअर बंधूनी तेथील भागात दाखविला. [११७] असे असले तरी ख-या अर्थाने चित्रपटाचा जन्म १९०३ साली झाला. अमेरिकेच्या एडवीन एस्. पोर्टर याने कांही तंत्रज्ञांच्या सहाय्याने " द ग्रेट ट्रेन रॅाबरी " हा सुमारे २४४ मीटर लांबीचा कथा चित्रपट तयार केला. [११८]

यानंतर एक दशकाने म्हणजे साधारण १९१३ साली भारतात चित्रपट कलेचा उदय झाला. [११९] भारतातही अनेक चित्रपट निर्मितीचे प्रयत्न सुरु होते. दादासाहेब फाळके [ १८७०-१९४४ ] या नासिक जवळील त्र्यंबक गावी जन्मलेल्या गृहस्थाने इंग्लंडला जाऊन छायाचित्रक यंत्र, सामुग्री व चित्रफीत याची मागणी नोंदविली व तेथे बरेच परदेशी चित्रपट पाहिले. परदेशातून यंत्रसामुग्री येईपर्यंत एका इमारतीत डार्क रुम, सजावट, काचेची चित्रनिर्मिती शाळा तयार करुन घेतली. चित्रपट सुरु करण्याआधी नमुना म्हणून

" रोपट्यांची वाढ " हा एक मिनिटाचा चित्रपट चित्रित केला.[१२०] नंतर " राजा हरिश्चंद्र " या चित्रपटाच्या निर्मितीस सुरुवात करुन २१ एप्रिल, १९१३ ला " राजा हरिश्चंद्र " या चित्रपटाचे उद्घाटन झाले.[१२१] श्री. फाळके यांना भारतीय चित्रपट कलेचे आद्य जनक म्हणून ओळखले जाते.[१२२]

चित्रपट व्यवसाय व कोल्हापूर यांचा विचार करता, चित्रपट व्यवसाय व कोल्हापूर यांची सुरुवात डेक्कन सिनेमाने झाला.[१२३] वाशीकर व आनंद मेस्त्री [ १८९०-१९१५ ] यांनी या चित्रपटगृहाची सुरुवात कधी केली, याची नक्की तारीख उपलब्ध झाली नाही, पण निर्मितीसाठी भांडवल न मिळाल्याने मेस्त्रीनी १९१३ ला भागीदारी सोडली व १९१४ ला रुईकर यांच्या भागीदारीमध्ये पेंटर बंधूंनी " महाराष्ट्र सिनेमा " हे चित्रपटगृह सुरु केले.[१२४] हा पहिला टप्पा मानला जावा. यात परदेशी चित्रपट प्रदर्शित केले जात. आनंदराव मेस्त्री व बाबूराव पेंटर [ १८९०-१९५४ ] या मावसभावांनी एक नादुरुस्त विल्यम्सन छायाचित्रक मिळविला व तो दुरुस्त करुन कांही दृश्यांची चांचणी घेतली. सदर चांचणी फारशी यशस्वी झाली नसली तरी चित्रपट निर्मितीची दिशा कळाली.[१२५] आनंदरावांनी स्वतःच छायाचित्रक बनविण्याचे ठरविले. छायाचित्रक तयार करण्यात थोडेफार यश येत असतानाच १९१५ साली आनंदरावांचे आकस्मात निधन झाले.[१२६]

चित्रपट निर्मितीचा प्रयत्न पुढे चालू ठेवून १ डिसेंबर, १९१७ ला बाबूराव पेंटरनी " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ही चित्रपट संस्था स्थापन केली.[१२७] त्यांनी छायाचित्रक तयार करण्यात यश मिळविले. पोहण्याची दृश्ये घेऊन मुंबईहून जुना प्रोजेक्टर [ चित्र पडद्यावर पाडण्याचे यंत्र ] आणून चित्रफिती पाहिल्या. १९१८ मध्ये लोकमान्य टिळकांनी मुंबई येथे कॉंग्रेसचे खास अधिवेशन बोलाविले होते, त्याचे चित्रीकरण बाबूराव पेंटरनी तेथे जाऊन केले. ते यशस्वी झाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला.[१२८]

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " तर्फे चित्रपट घेण्यासाठी तानीबाई कागलकरांनी आर्थिक मदत केली.[१२९] बाबूराव पेंटरनी सर्वप्रथम " सीता स्वयंवर " हा चित्रपट घेण्याचे ठरविले व सीतेच्या भूमिकेसाठी स्त्री कलावंत न मिळाल्याने " सैरंध्री " हा चित्रपट घेण्याचे निश्चित केले गेले. अशा रितीने १९१९ अखेर चित्रिकरण पूर्ण झाले.[१३०] अनेकवेळा चाचण्या घेऊन योग्य ते बदल करून चित्रपट दाखविण्याचे निश्चित केले.[१३१]

" सैरंध्री " हा चित्रपट ७ फेब्रुवारी, १९२० ला पुण्याच्या " आर्यन " चित्रपटगृहात लागला. लोकमान्य टिळकांनी हा चित्रपट पाहून बाबूराव पेंटर यांना " सिनेमा केसरी " ही पदवी दिली.[१३२] अशा रितीने करमणुकीचे एक नवीन माध्यम लोकांसमोर आले.

संदर्भग्रंथ व तळटीपा :


१] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, कोल्हापूर दर्शन, पृ. ६.

२] कित्ता, पृ. २६

३] कित्ता, पृ. २९

४] कित्ता, पृ. ४२७

५] कित्ता, पृ. ४२८

६] कित्ता, पृ. २७

७] कित्ता, पृ. २८

८] कित्ता, पृ. २८

९] कित्ता, पृ. २९

१०] कित्ता, पृ. २९

११] कित्ता, पृ. ४५

१२] कित्ता, पृ. ४९

१३] कित्ता, पृ. ५२

१४] कित्ता, पृ. ५४

१५] कित्ता, पृ. ५८

१६] कित्ता, पृ. ५९

१७] कित्ता, पृ. ६१

१८] कित्ता, पृ. ६३

१९] कित्ता, पृ. ६४

२०] कित्ता, पृ. ६५

२१] संपा. पी. बी. साळुंखे, राजर्षि शाहू छ. स्मारक भवन उद्घाटन समारंभ स्मरणिका, पृ. ७३.

२२] कित्ता, पृ. ८२

२३] कित्ता, पृ. ६८.

२४] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. २९४

२५] कित्ता, पृ. ३००

२६] कित्ता, पृ. ४४९

२७] कित्ता, पृ. ३४९

२८] कित्ता, पृ. ४४९

२९] कित्ता, पृ. २६४, ३७०

३०] संपा. पी. बी. साळुंखे, उपरोक्त, पृ. ७९

३१] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त पृ. ६५.

३२] कित्ता, पृ. ४५०

३३] कित्ता, पृ. ४५०

३४] कित्ता, पृ. २९५

३५] कित्ता, पृ. ४६७

३६] कित्ता, पृ. २९७

३७] कित्ता, पृ. ६६

३८] कित्ता, पृ. ६६

३९] कित्ता, पृ. २९७

४०] कित्ता, पृ. ६६

४१] कित्ता, पृ. ४५९

४२] कित्ता, पृ. २९८

४३] कित्ता, पृ. ३४९

४४] कित्ता, पृ. ३५१

४५] कित्ता, पृ. ३५०

४६] कित्ता, पृ. ३५१

४७] कित्ता, पृ. ३५०

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

४८] माने डी. ए., " ग्रोथ ऑफ द प्रेस इन द प्रिन्सली स्टेट ऑफ
कोल्हापूर फ्रॅाम १९२२ टू १९४९, पृ. १४
४९] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. ३९९
५०] कित्ता, पृ. ४००
५१] कित्ता, पृ. ३९९
५२] कित्ता, पृ. ४००
५३] कित्ता, पृ. ३६४
५४] कित्ता, पृ. ३६४, ३७१
५५] कित्ता, पृ. ३७०, ३७१
५६] कित्ता, पृ. ३७३
५७] कित्ता, पृ. ३७५, ३७६
५८] गाढवे ए. एस्., एंटरटेनमेंटस् ॲण्ड ॲम्युजमेंटस् डयुरींग द मराठा पिरीयड, पृ. ३९
५९] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. २४०
६०] कित्ता, पृ. २४१
६१] कित्ता, पृ. २४१
६२] कित्ता, पृ. २४०
६३] कित्ता, पृ. २४१
६४] कित्ता, पृ. २४५, २४७
६५] कित्ता, पृ. २४९
६६] कित्ता, पृ. २४८
६७] गाढवे ए. एस्., उपरोक्त, पृ. ४१
६८] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. २४०
६९] गाढवे ए. एस्., उपरोक्त, पृ. ६०, ६१
७०] कित्ता, पृ. ६०
७१] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. ३८३

७२] कित्ता, पृ. ३८४

७३] कित्ता, पृ. ३८४

७४] गाढवे ए. एस., उपरोक्त, पृ. १९

७५] कित्ता, पृ. ७९

७६] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. १६३

७७] कित्ता, पृ. ११७

७८] गाढवे ए. एस., उपरोक्त, पृ. २३

७९] कित्ता, पृ. ७५, ७६

८०] कित्ता, पृ. २७, २८

८१] कित्ता, पृ. २५

८२] कित्ता, पृ. २६

८३] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. ११७.

८४] कित्ता, पृ. १६८

८५] कित्ता, पृ. १६९

८६] कित्ता, पृ. ४५१

८७] कित्ता, पृ. १६९

८८] कित्ता, पृ. १७०

८९] कित्ता, पृ. ४७६

९०] कित्ता, पृ. ४५६

९१] कित्ता, पृ. १७१

९२] कित्ता, पृ. १७४

९३] कित्ता, पृ. १७४

९४] गाढवे ए. एस., उपरोक्त, पृ. ९९

९५] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. १७८

९६] कित्ता, पृ. ११७.

९७] कित्ता, पृ. ४५१

९८] कित्ता, पृ. १८७

९९] टेंबे गोविंदराव, " माझा जीवनविहार " , पृ. १८४.

१००] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. १८९

१०१] कित्ता, पृ. १९०

१०२] कित्ता, पृ. १९७

१०३] कित्ता, पृ. १९१, १९२.

१०४] कित्ता, पृ. ११७

१०५] कित्ता, पृ. ११७

१०६] कित्ता, पृ. ११७

१०७] कित्ता, पृ. ११७

१०८] संपा. पी. बी. साळुंखे, उपरोक्त, पृ. ९५

१०९] कित्ता, पृ. ५१

११०] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. ११७

१११] कित्ता, पृ. २६८, २७३.

११२] कित्ता, पृ. २६९

११३] कित्ता, पृ. २६८

११४] संपा. पी. बी. साळुंखे, उपरोक्त, पृ. ८५, ८६.

११५] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. २७१

११६] कित्ता, पृ. २७४.

११७] संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोश, खंड - ५, पृ. ८२२.

११८] कित्ता, पृ. ८२२

११९] संपा. वसंत साठे, चित्रसंपदा, पृ. ५३

१२०] मुजावर इसाक, दादासाहेब फाळके, पृ. ३३.

१२१] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ५०.

१२२] कित्ता, पृ. ५१.

१२३] भिडे ग. रं., बाबा गजबर, कलामहर्षि बाबूराव पेंटर, पृ. ४२.

१२४] कित्ता, पृ. ४३.

१२५] कित्ता, पृ. ४४.

१२६] कित्ता, पृ. ४५.

१२७] कित्ता, पृ. ५०.

१२८] कित्ता, पृ. ५१.

१२९] कित्ता, पृ. ११७.

१३०] कित्ता, पृ. ११७, ११८.

१३१] कित्ता, पृ. १२४.

१३२] कित्ता, पृ. ५४.